**प्रेस नोट** दि. १८/०४/२०१९.

**पोलीस चौकी सबलीकरणांतर्गत पोलीस चौक्यांना सेवा कार्यप्रणाली टॅबचे वाटप**

मा. पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी नव्यानेच सुरु केलेल्या पोलीस चौकी सक्षमीकरण अंतर्गत पुणे शहरामध्ये असणाऱ्या ३० पोलीस स्टेशनमधील १०२ पोलीस चौक्यांना चौकी प्रभारी अधिकारी म्हणुन काम करणाऱ्या अधिकारी व त्यांच्या लेखनिक (रायटर) यांना सेवा कार्यप्रणाली अंतर्गत सेवा टॅबचे वितरण व प्रशिक्षण सुनिल फुलारी अप्पर पोलीस आयुक्त (पुर्व प्रादेशिक विभाग) पुणे शहर व बच्चन सिंह पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ पुणे शहर यांचे वतीने आज दि. १८/०४/२०१९ रोजी हिरकणी हॉल पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे येथे देण्यात आलेले आहे.

या सेवा कार्यप्रणाली अंतर्गत पोलीस चौकीचे सक्षमीकरण होण्यासाठी तसेच पोलीस चौकीस येणा-या प्रत्येक नागरिकांच्या तक्रारींचे निरसन/ निवारण व निराकरण होण्यास या सेवा कार्यप्रणालीमुळे मदत होणार आहे, तसेच ज्या नागरिकांच्या तक्रारी पोलीस विभागाशी संबंधीत नाहीत व ज्या विभागाशी संबंधीत आहेत त्या विभागाची माहिती व दुरध्वनी क्रमांक/ संपर्क नंबर या प्रकल्पाद्वारे नागरिकांना देण्यात येणार आहे.

ज्या पोलीस चौकी मध्ये आलेल्या नागरिकांचे समाधान करणे तसेच त्यांच्या तक्रारीचे निरसन/ निवारण व निराकरण करणे हे चौकी प्रभारी अधिका-याचे कर्तव्यच आहे. जे नागरिक समाधानी होणार नाहीत किंवा त्यांना चौकी मध्ये चांगल्या प्रकारची वागणुक मिळणार नाही अशा नागरिकांची माहिती मध्यवर्ती सेवा कार्यप्रणाली केंद्र पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथे प्राप्त होणार असुन अशा नागरिकांना या केंद्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांच्या तक्रारीची विचारपुस होवुन तिचे निरसन/ निराकरण व निवारण करण्यात येणार आहे. ज्या पोलीस स्टेशनचे/ पोलीस चौक्यांच्या असमाधानी नागरिकांच्या तक्रारीचे प्रमाण जास्त असणार आहे अशा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला मध्यवर्ती केंद्रात बोलावुन त्या त्या नागरिकांना फोन करुन त्यांच्या तक्रारीचे निरसन/ निवारण व निराकरण करण्यास सांगण्यात येणार आहे.

यापुर्वी सदरचा प्रकल्प हा फक्त पोलीस स्टेशन स्तरावर राबविण्यात येत होता, तो आता चौकी स्तरावर राबविण्यात येणार आहे. गेल्या सहा महिन्यापासुन हा प्रकल्प

सुरु असुन त्यामधील समाधानी नागरिकांची संख्या जवळपास ९७ टक्के एवढी आहे. याच प्रकल्पाला ५६ व्या राष्ट्रीय ऑर्डर ऑफ मेरिट 'स्कॉच' हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

मा. डॉ. के. व्यंकटेशम पोलीस आयुक्त पुणे शहर यांचा हा सर्व सामान्य नागरिकांसाठी 'पिडीत सेवा श्रेष्ठ सेवा' हे बोध वाक्य घेवुन चालु करण्यात आलेल्या पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) आहे. तसेच पोलीस चौक्यांचे सबलीकरण करणे व पिडीत नागरिकांना तत्पर सेवा देणे हाही त्यामागील उद्देश आहे. श्री सुनिल फुलारी अप्पर पोलीस आयुक्त (पुर्व प्रादेशिक विभाग) पुणे शहर, श्री बच्चन सिंह पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ पुणे शहर, श्री दिपक बी. हुंबरे सहाय्यक पोलीस आयुक्त अभियान पुणे शहर, श्री बबन गायकवाड पोलीस उपनिरीक्षक, मपोना/ श्रीमती स्वाती राऊत, मपोना/ श्रीमती स्वाती पोमण, मपोशि/ सविता कळसकर, पोशि/ प्रशांत आदक (नियंत्रण कक्ष पुणे शहर) व श्री मनिष करंदीकर (एम्बेडेड क्रियेशन नागपुर) व त्यांची टीम हे या कामी पिडीत नागरिकांच्या तत्पर सेवेसाठी सदैव उपलब्ध व कार्यरत आहे.

सदरची प्रेसनोट आपल्या वर्तमान पत्रात प्रसिध्द होण्यास विनंती आहे.

दिपक बी. हुंबरे
सहाय्यक पोलीस आयुक्त (अभियान)
पुणे शहर


SEVA
Visitors Management
(Pilot-Project)

